# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## दिनांक ०२/०५/२०२४ (गुरूवार) सायंकाळ

---

### अवैधरीत्या जनावरांची वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद

दि. ०२/०५/२०२४ रोजी पोलीस स्टेशन मौदा येथे मा. वरिष्ठ पोनि सतीशसिंह राजपुत यांना गोपनीय खबर मिळाली की एम एच ४० वाय ३३८२ हे मोहाळी रोडने भंडारा रोड कडे जनावर गाडी भरुन वाहतुक करीत आहे अशा खबरी वरुन वरिष्ठ पोनि राजपुत साहेब व स्टाफ पोउपनि महेश बोथले , मपोहवा तेजस्वीनी कावळे , पोहवा रुपेश महादुले, गणेश मुदमाळी , दिपक दरोडे, आतीश गाढवे, शुभम इश्वरकर, अतुल निमबारते, हे खाजगी वाहनाने यांची टिम तयार करुन पोनि राजपुत यांनी स्वत: मोहाळी कडुन भंडारा येण्याऱ्या रोडवर स्टाफसह नाकाबंदी केली असता मोहाळी कडुन भंडारा नागपुर रोड कडे गाडी क्र. एम एच ४० वाय ३३८२ हे ही जवळ येत असतांना दिसली चालकांनी पोलीसांना बघुन गाडी थांबवुन गाडी मधील ३ इसम हे गाडीचे दरवाजे उघडुन पळु लागले स्टॉफ यांनी पाठलाग करुन त्यांना ताब्यात घेवुन त्यांचे विचारपुस केली असता आरोपी नामे १. मोहमद शहजाब मोहमद नवाब वय ३४ वर्ष, रा कामठी जि नागपुर, २. साहीर मोवीन कुरेशी वय २३ वर्ष रा कामठी रोड शारदा चौक कामठी नागपुर, ३. अवीनाश शिवपाल ढोके वय ३० वर्ष रा वार्ड न ३ गाडेघाट, जुनी कामठी जि नागपुर असे आहे त्यांचे गाडी मध्ये ताळपत्री मधुन पाहीले २२ जनावरे निदर्यतपणे बांधुन कोंबुन कत्तली साठी जिवंत वाहतुक करीत असतांना मिळुन आले आहे सदर गाडी क्र. एम एच ४० वाय ३३८२, २२ जनावरे, मोबाईल असे एकुण २४,७०,०००/— रु चा माल जप्त करुन पो स्टे मौदा येथे कलम ११(१), (ड), (घ) (च) प्रण्यांना छळ प्रतीबंधक अधिनीयम १९६० सहकलम ५, ५(अ),(१),९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनीयम अन्वये गुन्हा नोंद करुन पोउपनि महेश बोथले अधीक तपास करीत आहे

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ मा उपविभागीय पो अधिकारी साहेब कामठी विभाग यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार व पोनि सतिशसींह राजपुत, पोउपनि महेश बोथले ,मपोहवा तेजस्वीनी कावळे , पोहवा रुपेश महादुले, गणेश मुदमाळी , दिपक दरोडे, आतीश गाढवे, शुभम इश्वरकर, अतुल निंबारते यांनी केली आहे.




पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर